जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUN 2025
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाकडून ६५ स्टार्टअपना प्रोत्साहन

■ मंथली इनोव्हेशन चॅलेंजचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या 'एसयुके रिसर्च अँड फौंडेशन" या इनक्युबेशन सेंटरमध्ये शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्नप्रक्रिया आदी ६५ स्टार्टअप उद्योगांना बळ देण्यात येत आहे. या माध्यमातून नवउद्योगांना- विविध वित्त संस्थांकडून बीज भांडवलही देण्यात आले आहे. स्टार्टअप सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी आता मंथली इनोव्हेशन चॅलेंजद्वारे ही संधी चालून आली असल्याचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरमध्ये विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना समाजातील विविध समस्यांवर नाविन्यपूर्ण उत्तरे व समाधान सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमातून देण्यात आली. नाविन्यपूर्ण संकल्पना व नवयुवकांना उद्योजकतेच्या संधीही उपलब्ध करून देण्यात येत आहेत. निवड झालेल्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य, स्टार्टअप इंडिया, केंद्र सरकार, एमएसएमई, सारथी यांसह इतर शासकीय व खाजगी संस्थांकडून बीजभांडवल मिळण्याची संधी आहे. तरी इच्छुकांनी १५ रोजीपर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर न्यूज अँड इव्हेंटस् या विभागात जाऊन गुगल फॉर्ममध्ये नोंदणी करावी.